देवल संगीत विद्यालय,कोल्हापूर.

## • प्रवेश अर्ज •

विद्यार्थ्यांचे नाव:.______________________________

______________________________

पत्ता:.______________________________

______________________________

जन्म तारीख : / / वय :

मोबाईल क्र :.

पालकांचे नाव :______________________________

______________________________

विभाग :______________________________

तारीख : / / सही :

## • कार्यालयीन कामासाठी •

वरील विद्यार्थीस वर्गणी रु __ __ __ __ पावती क्र. __ __ __ __

ने स्वीकारुन वरील प्रवेश दिला आहे.

# गायन समाज देवल क्लब आणि देवल संगीत विद्यालय

संगीत, नृत्य आणि नाट्य या अभिजात भारतीय ललित कलांचे संवर्धन आणि प्रसार यासाठी गेली १४० वर्षे अव्याहत कार्य करणारी संस्था म्हणजे गायन समाज देवल क्लब. संस्थेची स्थापना १८८३ सालची असून प्रारंभापासून आज अखेर ही संस्था या कार्यासाठी निरंतर कार्य करत आहे.संस्थेतर्फे शास्त्रीय संगीताचे वर्ग जरी १८९० साली सुरू झाले तरी रीतसर शिक्षण गायन समाज देवल क्लबच्या 'देवल संगीत क्लब' मार्फत १९४७ साली सुरू झाले.

गेल्या ७५ वर्षात या संगीत विद्यालयातून अनेक गुणी विद्यार्थी तयार झाले आणि त्यांनी गायन,वादन,नृत्य या कलात प्राविण्य मिळविले.आपणही आमच्या संगीत विद्यालयात प्रवेश घेऊन या ललित कलात प्राविण्य मिळविण्यास उत्सुक आहात याचा आम्हास आनंद वाटतो.

आपले मन:पूर्वक स्वागत आणि ज्ञानार्जनासाठी शुभेच्छा...!

• तबला • हार्मोनियम • सतार • व्हायोलिन • बासरी •
• सुगम व शास्त्रीय गायन • कथक • भरतनाट्यम •

| वर्ग | मासिक वर्गणी |
|---|---|
| प्रारंभिक | ७५०/- |
| प्रवेशिका १ व २ | ८५०/- |
| मध्यमा १ व २ | १०००/- |
| विशारद १ व २ | १२५०/- |



### १) अभ्यासक्रम पद्धती

यात अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय च्या अभ्यासक्रम नुसार शिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम शिकवून झाला की आपण गुरुंच्या परवानगीने परीक्षा देऊ शकता.

### २) गुरुकुल पद्धती

यात प्राचीन गुरु शिष्य परंपरा प्रमाणे शिक्षण दिले जाते. कलाकार घडविण्याच्या दृष्टीने शिकवले जाते. इथे परीक्षा पद्धती लागू नाही. पण वर्षभरात जे शिकून पूर्ण झाले त्याची चाचणी गुरु अथवा अन्य शिक्षकांकडून केली जाते.

वरील पैकी कोणत्याही माध्यमातून आपण शिकू शकता.
दोन्ही चे वर्ग स्वतंत्र असतील.

देवल संगीत विद्यालय

# • नियमावली •

१ संगीत विद्यालयातील गायन, हार्मोनियम, तबला, व्हायोलिन, सतार, बासरी, सुगमसंगीत, कथक नृत्य व भरतनाट्यम नृत्य या विषयासाठी वर्षारंभी रीतसर प्रवेश पत्रिका भरून अग्रक्रमानुसार प्रवेश दिला जातो. प्रवेशासंबधीचे अंतिम अधिकार विद्यालय समितीला राहील. संस्थेकडे जागा अपुरी असल्याने प्रत्येक वर्गातील संख्या मर्यादित ठेवावी लागते.

२ सदर विद्यालय प्रवेशासाठी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे नियमाप्रमाणे प्रारंभिक वर्गासाठी विद्यार्थ्यांचे वय ०८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.

३ विद्यालयाचे वर्ष सर्वसाधारणपणे १२ महिन्याचे असून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयातर्फे वर्षाच्या अखेरीस (एप्रिल अखेरीस) परीक्षा घेतली जाते या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थितीसह त्याच्या विषयातील प्रगतीची अंतर्गत चाचणी परीक्षेद्वारे पाहणी करण्यात येते व मंडळाच्या परीक्षेसाठी अनुमती दिली जाते. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती व प्रगती समाधानकारक नसेल अशा विद्यार्थ्यांना परीक्षेत बसता येणार नाही .

४ सर्व वर्ग आठवड्यातून ०२ दिवस (प्रत्येकी ०१ तास) याप्रमाणे भरविले जातील.

५ विद्यालयातील विविध वर्गांची मासिक वर्गणी सोबतच्या प्रवेश अर्जा प्रमाणे राहिल. प्रवेशावेळी विविध कार्यक्रम वर्गणी रु.५००/- व जून ते ऑगस्ट या तीन महिन्याचे वर्गणी भरणे आवश्यक आहे. त्यानंतर सप्टेंबर ते डिसेंबर अखेरची वर्गणी १० सप्टेंबर पर्यंत व जानेवारी ते एप्रिल ची वर्गणी १० डिसेंबर भरणे आवश्यक आहे. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे परीक्षा शुल्क स्वतंत्र राहिल.

६ विद्यार्थ्याने आपली वर्गणी दिलेल्या वेळापत्रकानुसार आगाऊ भरणे आवश्यक आहे. वर्गणी वेळेस जमा न झाल्यास संबंधित विद्यार्थ्याचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता पटावरून कमी करण्याचा अधिकार संस्थेस राहील. तसेच मंडळाच्या परीक्षा फॉर्म दाखल करतेवेळी वर्षाची उर्वरित वर्गणी जमा असणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने वेळेवर आपापल्या वर्गात उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच वर्ग संपल्यावर पालकांनी आपल्या पाल्यास वेळेवर परत न्यावे प्रत्येकाने विद्यालयातील शिस्त पाळणे बंधनकारक आहे बेशिस्त गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास पटावरून कमी केले जाईल.

७ पालकांनी महिन्यातून एकदा संबंधित शिक्षकांकडे आपल्या पाल्याची प्रगतीविषयी चौकशी करावी. तसेच विद्यालयातील आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रम व मंच प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याचे उद्दिष्ट असल्याने अशा कार्यक्रमांना पालकांनी आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे या विद्यालयाचे कामकाजासंबंधी वेळोवेळी सूचनाफलकावरील काही सूचना लिहिल्या जातात त्याची नोंद घ्यावी.

८ सदर विद्यालय सेवाभावी वृत्तीने चालविले जाते. त्यामुळे विविध अडचणींना संस्थेस तोंड द्यावे लागते. विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यास उत्तम शिक्षण देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. मात्र शिक्षक अथवा साथीदारांच्या अनुपलब्धतेमुळे अथवा काही अपरिहार्य अडचणीस्तव एखादा वर्ग बंद करावा लागल्यास विद्यार्थ्यांचा अभ्यास करून पूर्ण करणे आवश्यक असते, अशा प्रसंगी सर्व पालकांचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच प्रत्येक वर्गासाठी आवश्यक ती संख्या न भरल्यास सदर वर्ग चालवणे अशक्य आहे याची कृपया नोंद घ्यावी.

९ विद्यालयासंबंधी व शिक्षक/साथीदारासंबंधी कोणत्याही प्रकारची सूचना व तक्रार करावयाची असल्यास व्यवस्थापक, विद्यालय समिती प्रमुख अथवा कार्यवाह यांच्याशी संपर्क साधावा. वरील नियम मी वाचले असून ते मला मान्य व बंधनकारक आहेत.

**विशेष सुचना** | महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार गांधर्व महाविद्यालयाच्या तीन परीक्षा उत्तीर्ण झालेस दहावी परीक्षेत एकूण गुणात १० गुणांची वाढ व ०५ परीक्षा उत्तीर्ण झालेस १५ गुणांची वाढ होणार आहे.


**गायन समाज देवल क्लब,१०८१ बी,खासबाग,मंगळवार पेठ, कोल्हापूर.**

**संपर्क :- कार्यालय : ९७६३ २३ ६०५२ / प्राचार्य : ९३२६ ०० ९३८६**

(सकाळी ११:०० ते संध्याकाळी ०५:००)


rakesh : 955 227 6060

स्थापना १८८३

संगीत । नृत्य । नाट्य

## गायन समाज देवल क्लब,

द्वारा संचालित

# देवल संगीत विद्यालय

कोल्हापूर.

